**L. A. BILL No. XCVI OF 2025.**

*A BILL*

TO AMEND CERTAIN ENACTMENTS FOR DECRIMINALISING AND RATIONALISING CERTAIN OFFENCES TO FURTHER ENHANCE TRUST-BASED GOVERNANCE FOR EASE OF LIVING AND EASE OF DOING BUSINESS IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६.**

**महाराष्ट्र राज्यामध्ये जीवन सुलभतेसाठी व व्यवसाय करणे सुलभ होण्यासाठी विश्वासावर आधारित शासन आणखी वृद्धिंगत करण्याकरिता विवक्षित अपराधांचे निर्गुन्हेगारीकरण व सुसूत्रीकरण करण्यासाठी विवक्षित अधिनियमितींची सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र राज्यामध्ये जीवन सुलभतेसाठी व व्यवसाय करणे सुलभ होण्यासाठी विश्वासावर आधारित शासन आणखी वृद्धिंगत करण्याकरिता विवक्षित अपराधांची निर्गुन्हेगारीकरण व सुसूत्रीकरण करण्यासाठी विक्षित अधिनियमितींची सुधारणा करण्यासाठी आणि तत्संबंधीत किंवा तदानुषंगिक बाबींसाठी

तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे. :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

विवक्षित अधिनियमांच्या सुधारणा.

**२.** यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक च्या स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या अधिनियमांची त्याच्या स्तंभ (५) मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत व त्या रीतीने सुधारणा करण्यात येत आहेत.

व्यावृत्ती.

**३.** (१) या अधिनियमाद्वारे कोणत्याही अधिनियमामध्ये केलेल्या सुधारणा, ज्या अधिनियमामध्ये सुधारणा अधिनियम लागू केलेला, समाविष्ट केलेला किंवा तो निर्देशित केलेला आहे, अशा अन्य कोणत्याही अधिनियमावर परिणाम करणार नाहीत.

(२) या अधिनियमाद्वारे, आधीच केलेल्या किंवा सोसलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेवर, अवैधतेवर, प्रभावावर किंवा परिणामावर, अथवा आधीच संपादित केलेल्या, उपार्जित केलेल्या किंवा पत्करलेल्या कोणत्याही हक्कावर, मालकी हक्कावर, आबंधनावर, किंवा दायित्वावर किंवा त्याच्या बाबतीतील कोणत्याही उपायावर किंवा कार्यवाहीवर, अथवा आधीच दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या, शास्तीच्या, आबंधनाच्या, दायित्वाच्या, हक्क मागणीच्या किंवा मागणीच्या कोणत्याही मुक्ततेवर किंवा उन्मुक्तीवर, अथवा कोणत्याही क्षतिपूर्तीवर अथवा मागील कृतीच्या किंवा गोष्टीच्या कोणत्याही पुराव्यावर कोणताही परिणाम होणार नाही.

(३) या अधिनियमाद्वारे कायद्याच्या कोणत्याही तत्त्वावर किंवा नियमावर, अथवा प्रस्थापित अधिकारक्षेत्रावर, वादकथनाच्या नमुन्यावर किंवा पद्धतीवर, प्रथेवर किंवा कार्यपद्धतीवर, अथवा विद्यमान परिपाठावर, रूढीवर, विशेषाधिकारावर, निर्बंधावर, माफीवर, पदावर किंवा नियुक्तीवर,- मग अनुक्रमे जरी ते यांद्वारे सुधारणा केलेल्या कोणत्याही अधिनियमाद्वारे, अधिनियमामध्ये किंवा अधिनियमातून कोणत्याही रीतीने दृढ केलेले, किंवा मान्यता दिलेले किंवा प्राप्त झालेले असले तरी,- कोणताही परिणाम होणार नाही.

(४) या अधिनियमाद्वारे कोणत्याही अधिनियमात केलेली सुधारणा, आता अस्तित्वात नसलेले किंवा अंमलात नसलेले कोणतेही अधिकारक्षेत्र, पद, रूढी, दायित्व, हक्क, मालकी हक्क, विशेषाधिकार, निर्बंध, माफी, परिपाठ, प्रथा, कार्यपध्दती, किंवा इतर कोणतीही बाब किंवा गोष्ट, पुनरुज्जीवित करणार नाही किंवा पुनर्स्थापित करणार नाही.

## अनुसूची - एक

(कलम २ पहा)

| अ. क्र. | अधिनियमाचे वर्ष | अधिनियमाचा क्रमांक | अधिनियमाचे संक्षिप्त नाव | अधिनियमाच्या सुधारणा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | १९४७ | ११ | महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम. | (१) प्रकरण १६ मधील, “शिक्षा” या शीर्षकाऐवजी, पुढील शीर्षक दाखल करण्यात येईलः-<br>“अपराध, दंड व शिक्षा”.<br>(२) कलम १०१ मध्ये, पोट-कलम (३) मधील, “५००० रुपयेपर्यंत” या मजकुराऐवजी, “पन्नास हजार रुपयांपर्यंत” हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(३) कलम १०२ मधील,-<br>(एक) “२,५०० रुपयांच्या” या मजकुराऐवजी, “पाच लाख रुपयांच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(दोन) “५००० रुपयांच्या” या मजकुराऐवजी, “दहा हजार रुपयांच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(तीन) समासटिपेतील “शिक्षा” या मजकुराऐवजी, “दंड” हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(४) कलम १०३ मधील,-<br>(एक) “ १० रुपयांच्या”या मजकुराऐवजी, “दहा हजार रुपयांच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(दोन) “१ रुपयाच्या” या मजकुराऐवजी, “दहा रुपयांच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(तीन) “५० रुपयांच्या” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपयांच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(चार) समासटिपेतील “शिक्षा” या मजकुराऐवजी, “दंड” हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(५) कलम १०४ मधील, समासटिपेतील “शिक्षा” या मजकुराऐवजी, “दंड” हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | (६) कलम १०५ मधील, “ज्या पक्षाने अशा कामकाजात ती माहिती दिली असेल” या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि “१००० रुपयांपर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र होईल” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :-<br><br>“ज्या पक्षाने अशा कामकाजात माहिती दिली असेल किंवा दस्तऐवज सादर केला असेल त्या पक्षाने केलेल्या तक्रारीवरून तो इसम वीस हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल, इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल”.<br><br>(७) कलम १०६ मध्ये,-<br><br>(एक) पोट-कलम (१) मधील, “५,००० रुपयांच्या” या मजकुराऐवजी, “पन्नास हजार रुपयांच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br><br>(दोन) समासटिपेतील “शिक्षा” या मजकुराऐवजी, “दंड” हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br><br>(८) कलम १०६अ मधील, “त्याजवर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यास तो पन्नास रुपयांपर्यंतच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल” या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि “प्रत्येक दिवसास पन्नास रुपयांपर्यंतच्या जादा दंडास पात्र होईल” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :-<br><br>“ तो पन्नास हजार रुपयांपर्यंतच्या शिक्षेस पात्र होईल आणि कसूर चालू राहिल्यास, अशी कसूर ज्या कालावधीत चालू राहिली असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या जादा शिक्षेस पात्र होईल ”.<br>(९) कलम १०७ मधील,-<br><br>(एक) “५०० रुपयेपर्यंत” या मजकुराऐवजी “दोन लाख रुपयांपर्यंत” हा मजकूर दाखल करण्यात येईल ; |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | (दोन) “१२५ रुपयेप्रमाणे” या मजकुराऐवजी, “दोन हजार रुपयांप्रमाणे” हा मजकूर दाखल करण्यात येईल ; |
| | | | | (तीन) समासटिपेतील, “शिक्षा” या मजकुराऐवजी, “दंड” हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | | | (१०) कलम १०८ मधील,- |
| | | | | (एक) “५०० रुपये पर्यंतच्या” या मजकुराऐवजी, “पन्नास हजार रुपयांपर्यंतच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल ; |
| | | | | (दोन) समासटिपेतील “शिक्षा” या मजकुराऐवजी, “दंड” हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | | | (११) कलम १०९ मधील,- |
| | | | | (एक) “दुसऱ्या कोणत्याही शिक्षेबद्दल” या मजकुरानंतर, “किंवा दंडाबद्दल” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ; |
| | | | | (दोन) “१०० रुपयेपर्यंतच्या” या मजकुराऐवजी, “दहा हजार रुपयांपर्यंतच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल ; |
| | | | | (तीन) “२०० रुपयेपर्यंतच्या” या मजकुराऐवजी, “वीस हजार रुपयांपर्यंतच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल ; |
| | | | | (चार) समासटिपेतील, “शिक्षा” या मजकुराऐवजी, “दंड” हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | | | (१२) कलम ११० मधील,- |
| | | | | (एक) “दंडाची” या मजकुरानंतर, “किंवा शिक्षेची” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ; |
| | | | | (दोन) समासटिपेतील, “दंड” या मजकुरानंतर, “ शिक्षा” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | (१३) कलम ११९अ मध्ये,-<br>(एक) पोट-कलम (१) मधील, खंड (ड) मध्ये, “एक हजार रुपयांपर्यंतच्या” या मजकुराऐवजी, “एक लाख रुपयांपर्यंतच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(दोन) पोट-कलम (२) मधील, “पाचशे रुपयांपर्यंतच्या” या मजकुराऐवजी, “पन्नास हजार रुपयांपर्यंतच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| २. | १९४९ | १५ | महाराष्ट्र शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम. | (१) कलम ६ मधील,-<br>(एक) “दहा हजार रुपयांपर्यंत” या मजकुराऐवजी, “एक लाख रुपयांपर्यंत” हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(दोन) समासटिपेतील, “शास्ती” या मजकुराऐवजी, “शिक्षा” हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(२) कलम ९ मधील, पोट-कलम(२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :-<br>“(२) जर कोणताही इसम, अशा कोणत्याही अधिकाऱ्यास वर सांगितल्याप्रमाणे, अशा कोणत्याही जागेत प्रवेश करू देण्यास किंवा तिची तपासणी करू देण्यास नाकारील, अथवा वर सांगितल्याप्रमाणे, अशा कोणत्याही कागदपत्रांची तपासणी करू देण्यास नाकारील अथवा अशा कोणत्याही अधिकाऱ्यास खोटी माहिती अथवा कागदपत्रे सादर करील अथवा कोणत्याही अशा अधिकाऱ्यास या कलमाखालील त्याचे अधिकार बजाविताना अडथळा करील तर, त्यास, दोषसिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची, अथवा दोन्ही शिक्षा होतील.”.<br>(३) कलम १२ मधील,-<br>(एक) “इतरत्र कोणत्याही शास्तीची” या मजकुरानंतर, “किंवा दंडाची” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ; |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | (दोन) समासटिपेतील, “शास्ति” या मजकुराऐवजी, “दंड” हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| ३. | १९५८ | ६० | महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम. | (१) कलम ५९ मधील,-<br>(एक) पोट-कलम (१) मधील, “एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु जास्तीत जास्त सहा महिने एवढ्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल” या मजकुराऐवजी, “एक महिन्यापेक्षा कमी नसेल, परंतु सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा, अथवा दोन्ही शिक्षा होतील” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(दोन) पोट-कलम (२) मधील, “पाचशे रुपये” या मजकुराऐवजी, “पन्नास हजार रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(तीन) समासटिपेतील, “शिक्षा” या मजकुराऐवजी, “शिक्षा” हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(२) कलम ६० मधील,-<br>(एक) “एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु जास्तीत जास्त सहा महिने एवढ्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल” या मजकुराऐवजी, “एक महिन्यापेक्षा कमी नसेल, परंतु, जास्तीत जास्त सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा, किंवा दोन्ही शिक्षा होतील” हा मजकूर दाखल करण्यात येईल ; |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | (दोन) समासटिपेतील, "शिक्षा" या मजकुराऐवजी, "शिक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | | | (३) कलम ६१ मधील,- |
| | | | | (एक) "शंभर रुपये" या मजकुराऐवजी, "पंचवीस हजार रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल; |
| | | | | (दोन) समासटिपेतील, "शिक्षा" या मजकुराऐवजी, "शिक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | | | (४) कलम ६२ मध्ये,- |
| | | | | (एक) खंड (क) मधील, "पाच हजार रुपये" या मजकुराऐवजी, "त्याच्या मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागाच्या पाच पट" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; |
| | | | | (दोन) समासटिपेतील, "शिक्षा" या मजकुराऐवजी, "शिक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | | | (५) कलम ६३अ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "एक महिन्यापेक्षा कमी नसणाऱ्या परंतु सहा महिन्यांपर्यंत वाढविता येणाऱ्या सक्षम कारावासाची आणि रूपये ५,००० पर्यंतच्या रकमेच्या दंडाची शिक्षा करता येईल" या मजकुराऐवजी, "एक महिन्यापेक्षा कमी नसेल, परंतु सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची, अथवा दोन्ही शिक्षा होतील" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | | | (६) कलम ६८अ मधील, "एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल" या मजकुराऐवजी, "एक महिन्यापेक्षा कमी नसेल, परंतु सहा |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा, अथवा दोन्ही शिक्षा होतील" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| ४. | १९६५ | ४६ | महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५. | कलम २९ मधील,-<br>(एक) "पाच हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "वीस हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(दोन) समासटिपेतील "शास्ती" या मजकुराऐवजी, "दंड" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| ५. | १९७२ | १ | महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९७१. | (१) प्रकरण नऊ मध्ये, "शास्ती" या शीर्षकाऐवजी "अपराध" हे शीर्षक दाखल करण्यात येईल.<br>(२) कलम ४७ मधील,-<br>(एक) "एक हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "पंचवीस हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(दोन) समासटिपेतील "शास्ती" या मजकुराऐवजी, "दंड" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(३) कलम ४८ मध्ये,-<br>(एक) पोट-कलम (१) मधील, "पाच हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "पन्नास हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(दोन) पोट-कलम (२) मधील, खंड (ड) मध्ये, "एक हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "एक लाख रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(तीन) पोट-कलम (३) मधील, "पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "एक लाख रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(४) कलम ४९ मध्ये,-<br>(एक) "पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "पन्नास हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | (दोन) समासटिपेतील, "शास्ती" या मजकुराऐवजी, "दंड" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| ६. | १९७५ | १६ | महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५. | कलमे २०, २१ व २३ वगळण्यात येतील. |
| ७. | २०१७ | ६१ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७. | (१) कलम ७ मध्ये, पोट-कलम (३) मधील, "एक हजार रुपयांच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल" या मजकुराऐवजी, "एक हजार रुपयांच्या शास्तीस पात्र असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(२) कलम २९ मधील,-<br>(एक) पोट-कलम (१) मधील,-<br>(क) "एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :-<br>"एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या शास्तीस आणि जर उल्लंघन करण्याचे चालू राहिल्यास, ज्या कालावधीत असे उल्लंघन करण्याचे चालू राहिले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त शास्तीस पात्र असेल";<br>(ख) परंतुकातील, "द्रव्यदंडाची" या मजकुराऐवजी, "शास्तीची" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | (दोन) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल:-<br>“(२) जर कोणत्याही व्यक्तीने, पोट-कलम (१) खालील, दुसरे किंवा त्यानंतरचे उल्लंघन केले असल्याचे आढळून आले तर, ती, अशा उल्लंघनाबद्दल दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या शास्तीस पात्र असेलः<br>परंतु, शास्तीची एकूण रक्कम, नोकरीवर ठेवलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्यामागे दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.”.<br>(३) कलम ३१ मध्ये,-<br>(एक) पोट-कलम (१) मधील, “त्याला अपराधसिद्धीनंतर दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल” या मजकुराऐवजी, “तो, दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या शास्तीस पात्र असेल” हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(दोन) पोट-कलम (२) मध्ये,—<br>(क) “त्याला अपराधसिद्धीनंतर दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल” या मजकुराऐवजी, “तो, दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या शास्तीस पात्र असेल” हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(ख) परंतुकामधील, “द्रव्यदंडाची” या मजकुराऐवजी, “शास्तीची” हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(४) कलम ३१ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :-<br>“**३१क. अभिनिर्णय.-**<br>(१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये किंवा त्याखालील केलेल्या कोणत्याही नियमांन्वये शास्ती निर्धारित करण्याच्या आणि लादण्याच्या प्रयोजनार्थ, विहित करण्यात येईल अशा रीतीने चौकशी करण्यासाठी व शास्ती लादण्यासाठी, शासकीय कामगार अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | अभिनिर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईलः<br>परंतु, राज्य शासनास, आवश्यकता असेल त्यानुसार, अनेक अभिनिर्णय अधिकारी नियुक्त करता येतील.<br>(२) अभिनिर्णय अधिकाऱ्यास, त्याच्या मते प्रकरणाची तथ्ये व परिस्थिती याबद्दल परिचय असलेल्या कोणत्याही व्यक्तीस साक्ष देण्यासाठी किंवा चौकशीच्या प्रतिपाद्य विषयासाठी उपयुक्त, किंवा संबंधित असेल असा कोणताही दस्तऐवज सादर करण्यासाठी समन्स बजावता येईल आणि तिला उपस्थित राहण्यास भाग पाडता येईल, आणि जर अशी चौकशी केल्यावर, संबंधित व्यक्तीने या कोणत्याही अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे, किंवा त्याखालील केलेल्या नियमांचे पालन करण्यात कसूर केली असल्याची खात्री पटली असेल तर, त्याला शास्ती लादता येईलः<br>परंतु, संबंधित व्यक्तीस, बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, अशी कोणतीही शास्ती लादण्यात येणार नाही.<br>**३१ख. अपील.–**<br>(१) कलम ३१क अन्वये अभिनिर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे जो कोणी व्यथित झाला असेल, त्याला, राज्य शासनाने अपील प्राधिकारी म्हणून विशेषरीत्या प्राधिकृत केलेल्या, कामगार उपायुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याकडे, आदेश मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने अपील दाखल करता येईल.<br>(२) जर अपीलकाराने, साठ दिवसांच्या कालावधीत अपील दाखल न करण्याबद्दल त्याला पुरेसे कारण होते याबद्दल अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटवून दिली तर साठ दिवसांचा कालावधी संपल्यानंतर देखील अपील दाखल करून घेता येईल. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | (३) अपील प्राधिकाऱ्यास, अपिलातील पक्षकारांना बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्याला योग्य वाटेल असा आदेश पारित करता येईल.<br><br>(४) पोट-कलम (१) खालील अपील, ते दाखल केल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत निकालात काढण्यात येईल.<br><br>(५) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर व्यक्तीने, कलम ३१क खालील अभिनिर्णय अधिकाऱ्याच्या आदेशाचे किंवा यथास्थिति, या कलमाखालील अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशाचे, अशा आदेशाच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत पालन करण्यात कसूर केली असेल तर, ती, शास्तीशिवाय, दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या किंवा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, अथवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.". |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

दंडात्मक, कठोर अनुपालनकारक व्यवस्थेचे विश्वासाधारित, सुविधाकारी शासन व्यवस्थेमध्ये परिवर्तन करण्याकरिता विनियमनकारी चौकटीमध्ये सुधारणा करणे हा, विकसित महाराष्ट्र व्हिजनचा मुख्य घटक आहे. अत्यधिक विनियमन, किरकोळ आणि तांत्रिक स्वरूपाचे गुन्हे आणि कार्यपद्धतीचे अनुपालन न केल्यामुळे होणारे गुन्हे यांमुळे व्यवसाय, नागरिक व राज्य यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागते. अशा तरतुदी, केवळ उद्योजकतेत आणि व्यवसाय सुलभतेत व जीवन सुलभतेत अडथळा आणत नाहीत तर, न्यायव्यवस्थेवर देखील अनावश्यक भार टाकतात व प्रशासकीय कार्यक्षमता देखील कमी करतात.

महाराष्ट्र शासन, जीवन सुलभतेच्या व व्यवसाय सुलभतेच्या व्यापक सुधारणांच्या अंतर्गत विनियमनकारी चौकटीचे सुलभीकरण व पुनर्निश्चितीकरण करून त्याद्वारे, 'किमान शासन, कमाल प्रशासन' या तत्त्वाचा पुरस्कार करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. या दृष्टीने, अनुपालनाचा भार सुलभ करणे आणि अधिनियमाच्या तरतुदींच्या किरकोळ उल्लंघनांचे निर्गुन्हेगारीकरण करणे हे, प्रमुख धोरणात्मक प्राधान्यक्रम राहिले आहेत.

**२.** केंद्र सरकारने, केंद्रीय अधिनियमांमधील विविध दंडात्मक तरतुदींचे निर्गुन्हेगारीकरण करणारे जन विश्वास (तरतुदींमध्ये सुधारणा) अधिनियम देखील अधिनियमित केलेले आहेत. केंद्र सरकारने, सर्व राज्यांना व संघराज्य क्षेत्रांना, त्यांच्या वैधानिक रूपरेषेचा आढावा घेण्यासाठी आणि राज्य स्तरावर निर्गुन्हेगारीकरण धोरण स्वीकारण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) अधिनियम, २०२३ यावरील संयुक्त संसदीय समितीच्या अहवालासह एक सल्लागारी सूचना देखील २०२३ मध्ये प्रसृत केली आहे.

**३.** महाराष्ट्र शासनाने, किरकोळ उल्लंघनाच्या गुन्हेगारीकरणाच्या तरतुदी निश्चित करण्यासाठी आणि त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आपल्या विनियमनकारी वैधानिक चौकटीचा सर्वंकष आढावा घेतला आहे. न्यायालयांवरील भार कमी करण्यासाठी आणि तसेच प्रशासकीय कार्यक्षमता वाढवण्यासाठी, दिवाणी स्वरूपाची शास्ती असलेल्या अशा किरकोळ उल्लंघनांबद्दल केल्या जाणाऱ्या शिक्षांमध्ये बदल करणे हा, राज्य शासनाचा हेतू आहे. अनुपालन न करणे, कार्यपद्धतीविषयक त्रुटी व कालबाह्य झालेल्या विनियमनकारी आवश्यकता यांच्याशी संबंधित असलेल्या किरकोळ अपराधांचे निर्गुन्हेगारीकरण करीत असतानाच, सार्वजनिक सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य, जीवन किंवा सुरक्षिततेला गंभीर धोका असलेले अपराध तसेच ठेवण्यात आले आहेत. याशिवाय, दंडासारख्या शिक्षांमध्ये सुधारणा व त्यांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे.

शासनाने, सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याद्वारे, अनुक्रमे, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम (१९५३ चा ११) यांमध्ये आणि सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याद्वारे, पाच राज्य कामगार कायद्यांमध्ये अंतर्भूत असलेल्या दंडात्मक तरतुदींमध्ये आधीच सुधारणा केलेली आहे.

**४.** आता, महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम (१९४७ चा ११), महाराष्ट्र शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम (१९४९ चा १५), महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०), महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४६), महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९७१ (१९७२ चा महा. १), महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) आणि महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) यांमध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**५.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे

नागपुर,
दिनांक ३ डिसेंबर, २०२५.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड २.**— (१) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) यामध्ये कलम ३१क समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या,या खंडाअन्वये, अनुसूची – एकमधील, अनुक्रमांक ७ येथील नोंदीमधील, परिच्छेद (४) मध्ये, अभिनिर्णय अधिकाऱ्याद्वारे उक्त अधिनियमान्वये चौकशी करण्याची व शिक्षा लादण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(२) उक्त अधिनियमामध्ये कलम ३१ख समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या, या खंडाअन्वये, अनुसूची – एकमधील, अनुक्रमांक ७ येथील नोंदीमधील, परिच्छेद (४) मध्ये, उक्त अधिनियमांन्वये कामगार उपायुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याकडे अपील दाखल करण्याचा नमुना व रीत, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

## सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ९६.—महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५

### (महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४७ यातील उतारे)

### (१९४७ चा महा. अधिनियम क्रमांक ११)

**१. ते १००.** ** ** ** **

प्रकरण सोळा

**शिक्षा**

मालकाने कामगारास बडतर्फ न करणे, पादवनत करणे किंवा शिक्षा न करणे.

**१०१.** (१) कोणताही मालक कोणत्याही कामगारास पुढील परिस्थितीच्या कारणास्तव,—

(अ) तो नोंदणीकृत संघाचा किंवा या अधिनियमान्वये नोंदणीसाठी ज्याने अर्ज केला आहे अशा संघाचा अधिकारी किंवा सदस्य आहे म्हणून ; किंवा

(ब) एखादा नोंदणीकृत कराराचा किंवा मिटवणुकीचा, सादर निवेदनाचा किंवा निवाड्याचा लाभ मिळण्याच्या त्यास हक्क आहे म्हणून ; किंवा

(क) या अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये चालू असलेल्या कार्यवाहीत साक्षीदार म्हणून हजर राहिला आहे किंवा हजर राहण्याचा त्याचा इरादा आहे किंवा त्याने कोणताही पुरावा दिला आहे किंवा पुरावा देण्याचा इरादा आहे किंवा या अधिनियमाखालील कार्यवाहीत किंवा अशा कार्यवाहीच्या संबंधात त्याने कोणत्याही नात्याने भाग घेतला आहे म्हणून ; किंवा

(ड) औद्योगिक परिस्थिती सुधारणे हा जिचा उद्देश आहे अशा संस्थेचा जो अधिकारी किंवा सदस्य आहे म्हणून ; किंवा

(इ) बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आलेली नाही अशा संस्थेचा जो अधिकारी किंवा सदस्य आहे म्हणून; किंवा

(फ) तो कामगार प्रतिनिधी आहे म्हणून ; किंवा

(ग) या अधिनियमाच्या तरतूदीन्वये कामगार न्यायालयाकडून किंवा औद्योगिक न्यायालयाकडून जो संप बेकायदेशीर ठरविण्यात आला नाही अशा संपावर तो गेला आहे किंवा त्यात सामील झाला आहे किंवा त्यास चिथावणी दिली आहे म्हणून ;

त्यास बडतर्फ करणार नाही किंवा सेवामुक्त करणार नाही किंवा पदावनत करणार नाही किंवा त्यास कोणत्याही इतर रीतीने शिक्षा करणार नाही.

(२) ** ** ** **
औद्योगिक विवादातून उद्‌भवलेला जो संप कामगार न्यायालयाकडून किंवा औद्योगिक न्यायालयाकडून बेकायदेशीर ठरविण्यात आला नसेल अशा संपाच्या बाबतीत—

(एक) ज्या वादविषयावरुन कामगाराने संप केला आहे तो वादविषय या अधिनियमान्वये लवादाकडे निर्देशित करण्यास मालकाने तयारी दर्शविली असेल आणि कामगाराने लवाद नाकारला असेल; किंवा

(दोन) कामगाराने लवाद नाकारला नसेल परंतु संप संपल्याचे राज्य शासनाने घोषित केल्यापासून एक महिन्याच्या आत, कामावर रुजू होण्यास आपली तयारी दर्शविली नसेल ;

या प्रसंगाव्यतिरिक्त इतर प्रसंगी कोणताही मालक कोणत्याही कामगारास, अशा संपानंतर, कामावर रुजू होण्याचा प्रतिबंध करणार नाही.

(२-अ) कोणताही मालक कामगार न्यायालयाच्या स्पष्ट लेखी परवानगीवाचून कोणत्याही संरक्षित कामगारास बडतर्फ करणार नाही, सेवामुक्त करणार नाही किंवा पदावनत करणार नाही.

स्पष्टीकरण.—या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, कोणत्याही उद्योगाच्या संबंधात "संरक्षित कामगार" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जो कामगार त्या उद्योगाशी संबंधित असेलल्या संघाचा पदाधिकारी असून या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनुसार त्यास असा पदाधिकारी म्हणून मान्यता दिली असेल असा कोणताही कामगार, असा होतो.

(२-ब) कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील प्रत्येक उद्योगात पोट-कलम (२-अ) च्या प्रयोजनाकरिता "संरक्षित कामगार" म्हणून मान्यता द्यावयाच्या कोणत्याही संघांच्या अधिकाऱ्यांची संख्या ही कमीत कमी पाच संरक्षित कामगार व जास्तीत जास्त शंभर संरक्षित कामगार या संख्येच्या अधीनतेने, त्या उद्योगात कामावर लावलेल्या एकूण कामगारांच्या शेकडा एक टक्काइतकी असेल, आणि उपरोक्त प्रयोजनाकरिता राज्य शासनाला, ज्या रीतीने कामगारांची निवड केली जाईल व त्यांना संरक्षित कामगार म्हणून ज्या रीतीने मान्यता दिली जाईल त्या रीतीसंबंधी तरतूद करण्याबाबत नियम करता येतील.

(३) जो कोणी पोट-कलम (१) (२) किंवा (२-अ)] च्या तरतुदींचे उल्लंघन करील, तो, अपराधसिध्दीनंतर ५,००० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल;

(४) व (५) ** ** ** **

बेकायदेशीर ठरविलेली टाळेबंदी किंवा कामबंदी घोषित करणे याबद्दल शास्ती.

**१०२.** कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने बेकायदेशीर म्हणून ठरविलेली टाळेबंदी किंवा कामबंदी ज्या कोणत्याही मालकाने सुरू केली असेल तो अपराधसिध्दीनंतर, २,५०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल; आणि जर, यथास्थिती अशी टाळेबंदी किंवा कामबंदी बेकायदेशीर असल्याचा निर्णय देण्यात किंवा घोषित करण्यात आल्यापासून अठ्ठेचाळीस तासांचा अवधी संपल्यानंतर चालू ठेवण्यात आली तर, अशा अपराधसिध्दिनंतर ज्या ज्या दिवशी अशी टाळेबंदी किंवा कामबंदी चालू राहील. त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी ५,००० रुपयांपर्यंत असेल इतक्या दंडाच्या शिक्षेस तो पात्र होईल.

बेकायदेशीर म्हणून ठरविलेला संप किंवा बेकायदेशीर कामबंदी घोषित करणे किंवा सुरू करणे याबद्दल शास्ती.

**१०३.** कामगार न्यायालयाने बेकायदेशीर मानलेल्या किंवा औद्योगिक न्यायालयाने बेकायदेशीर म्हणून घोषित केलेल्या संपावर जो गेला आहे किंवा जो कामरोधात सहभागी झाला आहे अथवा ज्या संपात किंवा कामरोधात सामील झाला आहे, अशा कोणत्याही कामगारास, कलम ९७, पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने "अपराधसिध्दीनंतर, तो, १० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल, आणि त्याने असा संप शिकिंवा यथास्थिति, कामरोध तो बेकायदेशीर ठरविल्यापासून अठ्ठेचाळीस तासांचा अवधी संपल्यानंतर चालू ठेवला तर, अशा अपराधसिंध्दीनंतर ज्या ज्या दिवशी असा संप किंवा कामरोध चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल, तो आणखी १ रुपयापर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल-मात्र अशा दंडाची कमाल मर्यादा ५० रुपये असेल.

बेकायदेशीर म्हणून ठरविलेला संप, टाळेबंदी, कामबंदी व कामरोधत यांस चिथावणी वगैरे देण्याबद्दल शास्ती.

**१०४.** ज्याबद्दल मालक, कलम १०२ अन्वये शिक्षेस पात्र आहे अशी टाळेबंदी किंवा कामबंदी यात किंवा ज्याबद्दल कोणताही कामगार कलम १०३ अन्वये शिक्षेस पात्र आहे असा संप किंवा कामरोध यात भाग घेण्यास . इतरांना जी कोणतीही व्यक्ती चिथावणी देईल किंवा प्रवृत्त करील किंवा त्याच्या पुरःसरणार्थ अन्यथा कृती करील ती व्यक्ती, अपराधसिध्दीनंतर, कैदेच्या दोहोंपैकी एका प्रकारच्या, तीन महिन्यापर्यंत वाढविता येईल इतक्या शिक्षेस किंवा दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल :

परंतु, अपराधाची संपरीक्षा करणाऱ्या न्यायालयाचे असे मत असेल की, प्रकरणाच्या एकंदर परिस्थितीवरून, ज्या वेळी असा अपराध घडला त्या वेळी यथास्थिति, असा संप, टाळेबंदी, कामबंदी किंवा कामरोध याच्या कायदेशीरपणाबद्दल वाजवी शंका घेण्यास कारण होते तर, या कलमान्वये कोणत्याही शिक्षा होणार नाही.

**स्पष्टीकरण .**—एक. या कलमाच्या प्रयोजनाकरिता असा कोणताही संप, टाळेबंदी, कामबंदी किंवा कामरोधा यांच्या प्रयोजनार्थ जी व्यक्ती अंशदान देईल, गोळा करील किंवा मागेल, तिने त्याच्या पुरःसरणार्थ कृत्य केले आहे. 'असे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—दोन.— बेकायदेशीर [संप, कामबंदी किंवा कामरोध ] हे सुरू होण्यापूर्वी त्यात भाग घेण्याविषयी ..इतरांस जिने चिथावणी दिली असेल किंवा प्रवृत्त केले असेल किंवा त्याच्या पुरःसरणार्थ अन्यथा कृती केली असेल, तिने या कलमाखाली अपराध केला आहे, असे मानले जाईल.

**१०५.** जर समेटकर्ता, मंडळाचा सदस्य किंवा कामगार अधिकारी किंवा कोणत्याही समेटासंबंधीच्या कार्यवाहीत हजर असलेली किंवा तिच्याशी संबंध असलेली कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतीही माहिती किंवा कोणत्याही दस्तऐवजातील मजकूर जाणूनबुजून उघड करील तर ती, ज्या पक्षाने अशा कार्यवाहीत माहिती दिली असेल किंवा दस्तऐवज हजर केला असेल त्याने तक्रार केल्यावर अपराधविध्दीनंतर ९००० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल..

गोपनीय माहिती उघड केल्याबद्दल शास्ती.

**१०६.** (१) जो कोणताही मालक कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने जो बदल बेकायदेशी असल्याचा निर्णय दिला असेल किंवा घोषित केला असेल असा फेरबदल करील], तो अपराधसिध्दीनंतर ५,००० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. :

बेकायदेशीर बदलाबद्दल शास्ती.

(२) व (३) ** ** ** **

**१०६-अ.** संघाने केलेल्या अर्जावरून रचना करावयाच्या संयुक्त समितीवर जो कोणताही मालक कलम ४९, पोटकलम (१) अन्वये दिलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत सदस्य नेमण्यात कसूर करील, तो, अपराधसिध्दीनंतर पन्नास रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल; आणि अशी कसून चालू राहिल्यास, अशी कसूर चालू राहील त्या प्रत्येक दिवसाला पन्नास रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या अतिरिक्त दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.] कलम ३५ अन्वये किंवा कलम ४०० अ अन्वये.

संयुक्त समितीवर सदस्य नेमण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

**१०७.** जो कोणताही मालका कलम ३५ अन्वये किंवा कलम ४०-अ अन्वये लागू करण्यात येणारा आदर्श स्थायी आदेश किंवा प्रकरण सात अन्वये निश्चित केलेल्या स्थायी आदेशांचे उल्लंघन करून एखादी कृती करील तो, अपराधसिध्दीनंतर ५०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल; आणि अशा स्थायी आदेशाचे उल्लंघन चालू राहिल्यास, असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाला १२५ रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या अतिरिक्त दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

स्थायी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**१०८.** जी कोणतीही व्यक्ती, कामगार अधिकाऱ्यास किंवा कलम २५ अन्वये ज्यास प्राधिकृत करण्यात आले असेल अशा मान्यताप्राप्त संघाच्या अधिकाऱ्यास ज्या ठिकाणी प्रवेश करण्याचा हक्क असेल अशा ठिकाणी प्रवेश करू देण्याचे बुध्दिपुरस्सर नाकारील किंवा जो कोणताही दस्तऐवज हजर करण्यास तिला फर्माविण्यात येईल तो हजर करण्यात कसूर करील किंवा हा अधिनियम अथवा तदन्वये केलेले नियम यांच्या तरतुदीनुसार किंवा तदन्वये केलेली कोणतीही मागणी पुरी करण्यात अथवा दिलेला कोणताही आदेश पाळण्यात कसूर करील, ती अपराधसिध्दिनंतर ५०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

कर्तव्य पार पाडण्याच्या कामात एखाद्या व्यक्तीस अडथळा केल्याबद्दल शास्ती.

**१०९.** जी व्यक्ती हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम यांच्या तरतुदीपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील, ती अपराधसिध्दीनंतर जर अशा उल्लंघनाबद्दल या अधिनियमाअन्वये किंवा तदनुसार इतरत्र दुसऱ्या कोणत्याही शास्तीची तरतूद करण्यात आली नसेल तर, १,०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि अशा व्यक्तीस या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार केलेल्या नियमाअन्वये पूर्वी सिध्दापराध ठरविण्यात आले असेल तर, ती २०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

इतरत्र तरतूद केलेल्या अपराधांबद्दल शास्ती.

दंड आणि भरपाई यांची वसुली.

**११०.** कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमान्वये भरावयाची रक्कम म्हणून बसविलेल्या कोणत्याही दंडाची आणि निदेशित केलेल्या कोणत्याही भरपाईची रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

**१११.** ते **११९.** ** ** ** **

दस्तऐवज वगैरे हजर न केल्यामुळे औद्योगिक न्यायालयाचा, कामगार न्यायालयाचा आणि वेतन मंडळाचा अवमान.

[**११९- अ.** जर कोणतीही व्यक्ती—

(अ) ते (क) ** ** ** **

(ड) औद्योगिक न्यायालय किंवा कामगार न्यायालय किंवा वेतन मंडळ याच्यापुढील कोणत्याही न्यायिक कार्यवाहीच्या टप्प्यावर अशा न्यायालयाचा किंवा मंडळाचा अद्देशपूर्वक अवमान करील किंवा त्याच्या कामात अडथळा आणील ;

तर ती, अपराधसिध्दीनंतर सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(२) व (३) ** ** ** **

**११९ब.** ते **११९ इ** ** ** ** **

**१२०.** ते **१२३अ.** ** ** ** **

**अनुसूची.** ** ** ** **

## ( मुंबई शुश्रूषा - गृह नोंदणी अधिनियम, १९४९ यातील उतारे )

## ( १९४९ चा महा. अधिनियम क्रमांक १५)

**१.** व **२.** ** ** ** **

नोंदणी वाचून शुश्रृषा-गृह चालविण्यास प्रतिषेध.

**३.** कोणत्याही व्यक्तीची शुश्रूषा-गृहाच्या संबंधात योग्यरीतीने नोंदणी झाली नसेल तर आणि ! त्याची नोंदणी झालेली असल्यास, ती नोंदणी कलम ७ अन्वये रद्द करण्यात आली असेल तर, त्याला असे शुश्रूषा गृह चालविता येणार नाही :

परंतु, जर एखादे शुश्रूषा-गृह कलम ३ त्या क्षेत्रात त्या क्षेत्रात अंमलात आल्याच्या दिनांकास अशा कोणत्याही क्षेत्रात अस्तित्वात असेल तर अशा दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीपर्यंत किंवा कलम ४ च्या तरतुदीस अनुसरुन अशा मुदतीच्या आत नोंदणीसाठी अर्ज करण्यात आला असेल तर, अशा अर्जाची अखेरची विल्हेवाट लावण्यात येईपर्यंत त्या शुश्रूषा-गृहाच्या बाबतीत या कलमातील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

**४.** **व** **५.** ** ** ** **

नोंदणी न केल्याबद्दल शास्ती.

**६.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ३ च्या तरतुदीचे उल्लंघन करील तिला, दोष सिद्ध झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**७.** **व** **८.** ** ** ** **

**९.** (१) ** ** ** ** शुश्रृषा-गृहाची तपासणी.

(२) जर कोणतीही व्यक्ती, कोणत्याही अशा अधिकाऱ्यास वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही अशा जागेत प्रवेश करू देण्याचे किंवा तिची तपासणी करू देण्याचे नाकारील किंवा वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही अशा कागदपत्राची तपासणी करू देण्याचे नाकारील किंवा कोणत्याही अशा अधिकाऱ्यास या कलमान्वये त्याचे अधिकार बजाविताना अडथळा करील तर, तो या अधिनियमाखालील अपराध केल्याबद्दल दोषी आहे, असे समजले पाहिजे.

**१०.** व **११.** ** ** ** **

**१२.** जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्यास, दोषी ठरविण्यात आले असता, अशा उल्लंघनाबद्दल या अधिनियमात किंवा नियमात इतरत्र कोणत्याही शास्तीची तरतूद करण्यात आली नसेल तर, जास्तीत-जास्त पाच हजार रुपये द्रव्य दंडाची शिक्षा होईल आणि अपराध चालू राहिल्याचे बाबतीत अशा दोष सिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी असा अपराध चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल त्यास आणखी पन्नास रुपये दंडाची शिक्षा होईल. या अधिनियमाखालील अपराधाबद्दल शास्ती.

**१३.** ते **१८.** ** ** ** **

## ( महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ यातील उतारे )

## ( १९५८ चा महा. अधिनियम क्रमांक ६० )

**१.** ते **५८.** ** ** ** **

**५९.** (१) जी कोणतीही व्यक्ती शुल्क चुकविण्याच्या हेतूने, शुल्क आकारण्यास पात्र असा कोणताही संलेख, तो रीतसर मुद्रांकित न करता निष्पादित करून देईल किंवा त्यावर साक्षीदार म्हणून सही न करता अन्यथा सही करील अशा व्यक्तीला अपराध सिद्ध झाल्यावर अशा प्रत्येक अपराधाबद्दल एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईलः रीतसर मुद्रांकित नसलेले संलेख निष्पादित करून देणे, वगैरेबद्दल शिक्षा.

परंतु, जेव्हा कलम ३४, कलम ३९ किंवा कलम ५८ खाली कोणत्याही संलेखाच्या संबंधात कोणतीही शास्ती भरण्यात आली असेल तेव्हा, अशी शास्ती भरणाऱ्या व्यक्तीवर त्याच संलेखाबाबत या कलमाखाली मागाहून जो द्रव्यदंड (कोणताही असल्यास) बसविला जाईल त्यातून या शास्तीची रक्कम वजा करण्याची परवानगी दिली जाईल.

(२) जर एखादे शेअर - अधिपत्र रीतसर मुद्रांकित न करता देण्यात आले असेल तर, ते देणाऱ्या कंपनीस व तसेच ते देतेवेळी कंपनीचा कार्यकारी संचालक किंवा सचिव किंवा अन्य प्रमुख अधिकारी म्हणून असलेल्या प्रत्येक व्यक्तीसदेखील अपराध सिद्ध झाल्यावर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

**५९-अ.** ** ** ** **

**६०.** जी कोणतीही व्यक्ती, वटवणी यादीत जे खोटे आहे आणि किंवा जे खोटे असल्याचे तिला एकतर माहीत आहे किंवा ते तसे असल्याबाबत तिला विश्वास आहे असे एखादे अधिकथन करील तिला, अपराध सिद्ध झाल्यावर एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल. वटवणी यादीत खोटे अधिकथन केल्याबद्दल शिक्षा.

**६१.** ज्या कोणत्याही व्यक्तीने कलम १२ द्वारे चिकट मुद्रांक रद्द करणे आवश्यक असेल आणि जिने त्या कलमाद्वारे विहित केलेल्या रीतीने असा मुद्रांक रद्द करण्यात कसूर केली असेल त्या व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यावर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल. चिकट मुद्रांक रद्द करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा.

कलम २८ च्या तरतुदींचे अनुपालन न करण्याबद्दल शिक्षा.

**६२.** शासनाला ठकवण्याच्या हेतूने जी कोणतीही व्यक्ती,—

(अ) **व** (ब) ** ** ** **

(क) या अधिनियमाखालील कोणतेही शुल्क किंवा शास्ती मिळण्यापासून शासनाला वंचित करण्याच्या दृष्टीने कोणतेही खोटे विधान करील किंवा दुसरे कोणतेही कृत्य करील ;

तिला, अपराध सिद्ध झाल्यावर पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

**६३.** ** ** ** **

विहित कालावधीत मुद्रांक शुल्काचा भरण न भरणे हा अपराध मानणे.

**६३-अ.** (१) महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९९७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त दिनांक असा करण्यात आला आहे), कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही व्यक्तीकडून मुद्रांक शुल्क म्हणून कोणतीही रक्कम वसूल केली तर, किंवा उक्त दिनांकानंतर कोणत्याही वेळी वसूल करीत असेल तर उक्त दिनांकापासून १२० दिवसांच्या आत किंवा यथास्थिति, अशी रक्कम वसूल केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सरकारी कोषागारात किंवा प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे किंवा याबाबतीत राज्य शासन, **राजपत्रात** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्या कोणत्याही अन्य ठिकाणी, भरणा करील.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्ध झाल्यावर, एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

**६४. ते ६८.** ** ** ** **

अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणे किंवा त्याची अडवणूक करणे हा अपराध असणे.

" **६८अ.** जर कोणतीही व्यक्ती कलम ६८ अन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या प्रवेशास प्रतिबंध करील किंवा त्यांची अडवणूक करील किंवा उचित सहाय्य करणार नाही तर, त्या व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यावर, एका महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.".

**६९. ते ७६.** ** ** ** **

**अनुसूची** ** ** ** **

## (महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ यातील उतारे)

## (१९६५ चा महा. अधिनियम क्रमांक ४६)

**१. ते २८.** ** ** ** **

नोंदणी केली आहे, असे खोटे सांगितल्याबद्दल शास्ती.

**२९.** ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव त्या त्या वेळी नोंदवहीत नोंदवण्यात आले नसेल अशा व्यक्तीने, ते अशा रीतीने नोंदविण्यात आले आहे असे खोटे अभिवेदन केले किंवा ज्यामुळे तिचे नाव अशा रीतीने नोंदविण्यात आले आहे असा समज होईल अशा तऱ्हेने आपल्या नावाच्या किंवा किताबाच्या संबंधात कोणत्याही शब्दांचा किंवा अक्षरांचा वापर केला तर, त्यास अपराध दोषानंतर पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**३०. ते ३६.** ** ** ** **

**अनुसूची** ** ** ** *

**(महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९७१ यातील उतारे )**

**( १९७२ चा महा. अधिनियम क्रमांक १ )**

**१.** ते **४६.** ** ** ** **

**४७.** अन्वेषण अधिकाऱ्याने किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही वेळी उपस्थित असलेल्या किंवा त्यात संबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून, कोणतीही माहिती किंवा कोणत्याही दस्तऐवजातील मजकूर जाणूनबुजून उघड केला तर अशा कार्यवाहीत ज्या पक्षकाराने ती माहिती दिली असेल किंवा तो दस्तऐवज सादर केला असेल त्या पक्षकाराने केलेल्या तक्रारीवरून, त्यास सिद्धापराध ठरविण्यात आल्यावर एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल. गोपनीय माहिती उघड केल्याबद्दल शास्ती.

**४८.** ( १ ) जी व्यक्ती या अधिनियमाचे कलम ३०, पोट-कलम ( १ ), खंड ( ब ) किंवा पोट-कलम ( २ ) खालील न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यात कसूर करील त्या व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यापर्यंत वाढविता येईल इतकी कैदेची शिक्षा किंवा पाच हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल. औद्योगिक किंवा कामगार न्यायालयांचा अवमान.

( २ ) ( अ ) ते ( क ) ** ** ** **

( ड ) औद्योगिक न्यायालयाच्या किंवा कामगार न्यायालयाच्या न्यायिक कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर अशा न्यायालयाचा अपमान करील किंवा कार्यवाहीत. कोणताही अडथळा आणण्यास कारणीभूत होईल;

तर तिला अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या अवधींची कैदेची शिक्षा किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

( ३ ) कोणत्याही व्यक्तीला तिने केलेल्या कोणत्याही निवेदनावर सही करण्याबद्दल औद्योगिक न्यायालयाने किंवा कामगार न्यायालयाने फर्माविले असेल तेव्हा तसे करण्यास त्या व्यक्तीने नकार दिला तर, तिला अपराधसिद्धीनंतर तीन महिन्यापर्यंत वाढविता येईल इतकी कैदेची शिक्षा किंवा पाचशे रुपयापर्यंत वाढविता येईल इतकी दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

( ४ ) **ते** ( ८ ) ** ** ** **

**४९.** जी कोणतीही व्यक्ती हेतुपुरस्सर,— अधिकाऱ्यास आपली कर्तव्ये पार पाडण्यास अडथळा केल्याबद्दल आणि दस्तऐवज सादर करण्यात कसूर केल्याबद्दल किंवा मागणीचे अथवा आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

(एक) अधिकाऱ्यांना, कार्यालयीन कर्मचाऱ्यांना किंवा कोणत्याही संघाच्या सदस्यांना, या अधिनियमाद्वारे त्यांना प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास प्रतिबंध करील किंवा अडथळा आणील;

( दोन ) अन्वेषण अधिकाऱ्यास ज्या कोणत्याही ठिकाणी प्रवेश करण्याचा हक्क असेल त्या ठिकाणी अशा अधिकाऱ्यास प्रवेश नाकारील;

(तीन) जो कोणताही दस्तऐवज सादर करण्यास तिला फर्माविले असेल तो दस्तऐवज सादर करण्यात कसूर करील; किंवा

(चार) या अधिनियमाच्या किंवा तद्न्वये केलेल्या नियमाच्या तरतुदीद्वारे किंवा तद्न्वये तिच्याकडे केलेल्या कोणत्याही मागणीचे किंवा आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर करील;

त्या व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर, पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल.

**५०.** ते **६१.** ** ** ** **

**अनुसूची** ** ** ** **

## (महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५ यातील उतारे)

## ( १९७५ चा महा. अधिनियम क्रमांक १६)

**१.** ते **१९.** ** ** ** **

**१९अ.** आणि **१९ब.** ** ** ** **

अपराध आणि शास्ती.

**२०.** जी कोणतीही व्यक्ती किंवा मालक या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे पालन करण्यात पुरेसे कारण नसताना कसूर करील ती व्यक्ती किंवा मालक, अपराधसिद्धीनंतर पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसणाऱ्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि अपराध चालू राहणारा असेल तेव्हा तो अपराध चालू असेल अशा मुदतीतील प्रत्येक दिवसासाठी, पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**२१.** ( १ ) या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्या बाबतीत अपराध घडला त्यावेळी कंपनीची प्रभारी असेल आणि जी कंपनीचा कारभार चालविण्यासाठी कंपनीस जबाबदार असेल अशी प्रत्येक व्यक्ती तसेच कंपनी ही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तो तिच्याविरुद्ध खटला भरला जाण्यास आणि तदनुसार शिक्षा होण्यास पात्र ठरेल :

परंतु, अपराध आपल्या नकळत झाला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्व यथोचित दक्षता घेतली होती असे जर त्या व्यक्तीने सिद्ध केले तर या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती अशी कोणतीही शिक्षा होण्यास पात्र ठरणार नाही.

( २ ) पोट-कलम ( १ ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध एखाद्या कंपनीकडून झालेला असेल तर आणि तो कंपनीचा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा किंवा हयगय केल्यामुळे झाला असे सिद्ध करण्यात येईल त्या बाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तो त्याच्याविरुद्ध खटला भरला जाण्यास आणि तदनुसार शिक्षा होण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

( अ ) " कंपनी " याचा अर्थ कोणताही निगमनिकाय असा होतो आणि त्यामध्ये एखादी भागीदारी संस्था किंवा व्यक्तींची इतर संघटना यांचा समावेश होतो; आणि

(ब) भागीदारी संस्थेच्या संबंधात " संचालक " याचा अर्थ भागीदारी संस्थेतील भागीदार असा होतो.

**२२.** ** ** ** **

अपराध आपसात मिटवणे.

**२३.** (१) विहित करण्यात येतील अशा शर्तीच्या अधीन राहून आयुक्तास, या अधिनियमाखालील अपराधांबाबतची कार्यवाही एकतर दाखल करण्यापूर्वी किंवा ती दाखल केल्यानंतर, ज्या कराच्या रकमेबाबत अपराध घडला असेल त्या कराच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल इतकी, आयुक्त ठरवील ती रक्कम दिल्यानंतर, अपराधाचा दोषारोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीस तो अपराध आपसात मिटविण्यास परवानगी देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आयुक्तांकडून ठरविण्यात येईल अशी रक्कम दिल्यानंतर, त्याच अपराधाच्या संबंधात त्या व्यक्तींविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

**२४.** ते **३०.** ** ** ** **

**अनुसूची** ** ** ** **

## (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यातील उतारे)

## ( २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६१ )

**१.** ते **६.** ** ** ** **

**७.** (१) **व** (२) ** ** ** ** — दहापेक्षा कमी कर्मचारी नोकरीवर ठेवलेल्या आस्थापनेने द्यावयाचे सूचनापत्र

(३) जो कोणी या कलमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करील तो, एक हजार रुपयांच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

**८.** ते **२८.** ** ** ** **

**२९.** (१) जो कोणी, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन करील, तो एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि उल्लंघन करण्याचे चालू ठेवल्यास असे उल्लंघन ज्या कालावधीकरिता चालू ठेवले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेलः — या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास शास्ती.

परंतु, द्रव्यदंडाची एकूण रक्कम, नोकरीवर ठेवलेल्या प्रति कर्मचाऱ्यामागे दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

(२) पोट-कलम (१) खालील कोणताही शिक्षापात्र अपराध केल्याबद्दल सिद्धापराधी ठरविण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, त्याच तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे किंवा त्या तरतुदींचे अनुपालन करण्यात कसूर केल्यामुळे, झालेल्या अपराधाबद्दल पुन्हा दोषी ठरली असेल तर ती नंतरच्या सिद्धापराधाबद्दल तिला दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईलः

परंतु, द्रव्यदंडाची एकूण रक्कम ही, नोकरीवर ठेवलेल्या प्रति कर्मचाऱ्यामागे तीन हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

**३०.** ** ** ** **

**३१.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये सुविधाकारास प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांचा तो वापर करीत असताना जो कोणी, बुद्धिपुरस्सर अडथळे निर्माण करील किंवा आस्थापनांच्या बाबतीत, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्राधिकृत केलेल्या सुविधाकारास कोणतीही तपासणी, परीक्षण, चौकशी किंवा अन्वेषण करण्यासाठी कोणतीही वाजवी सुविधा देण्यास नकार देईल किंवा बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करील, त्याला अपराधसिद्धीनंतर दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल; — सुविधाकारास अडथळे निर्माण करणे किंवा नोंदवही, इत्यादी पुरवण्यास नकार देणे याबाबत शास्ती.

(२) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या अनुषंगाने ठेवलेली कोणतीही नोंदवही किंवा इतर कागदपत्र सुविधाकाराने मागणी केल्यावर सादर करण्यास जो कोणी, बुद्धिपुरस्सर नकार देईल अथवा कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमान्वये आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने काम करणाऱ्या सुविधाकारापुढे हजर होण्यास किंवा तपासणी करण्यास प्रतिबंध करील किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील किंवा प्रतिबंध केला असल्याचे मानण्यास संयुक्तिक कारण असेल असे काहीही करील, त्याला अपराधसिद्धीनंतर दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईलः

परंतु, द्रव्यदंडाची एकूण रक्कम ही, नोकरीवर ठेवलेल्या प्रति कर्मचाऱ्यापोटी दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

**३२.** ते **३९.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६.]**

**[ महाराष्ट्र राज्यामध्ये जीवन सुलभतेसाठी व व्यवसाय करणे सुलभ होण्यासाठी विश्वासावर आधारित शासन आणखी वृद्धिंगत करण्याकरिता विवक्षित अपराधांचे निर्गुन्हेगारीकरण व सुसूत्रीकरण करण्यासाठी विवक्षित अधिनियमितींची सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**

**मुख्यमंत्री.]**

**जितेंद्र भोळे,**

सचिव-१,

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.